# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांक:13.02.2025 वार:गुरुवार

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फ्रान्स भेटीमुळे भारत आणि फ्रान्समधील मजबूत धोरणात्मक भागीदारी आणखी बळकट
2. राज्यांमधील सहकारी संस्थांचा एकसमान आणि संतुलित विकास करण्यासाठी सरकार विशेष उपाययोजना करणार : सहकार मंत्री अमित शहा
3. जानेवारीमध्ये किरकोळ महागाई दर घसरून 5 महिन्यांच्या नीचांकी पातळीवर
4. 'रेडिओ आणि हवामान बदल' ही आजच्या, जागतिक रेडीओ दिनाची संकल्पना आणि
5. पन्नास षटकांच्या क्रिकेटमध्ये, इंग्लंडचा 142 धावांनी पराभव करत भारताचा मालिका विजय.

**मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्सचा दौरा यशस्वीपणे पूर्ण करून काल अमेरिकेला पोहोचले आहेत. अध्यक्ष डोनल्ड ट्रंप यांची भेट घेऊन ते उभय देशांमधील विविधांगी प्रगतीचा आढावा घेणार आहेत. तत्पूर्वी, फ्रान्स दौऱ्यात भारत आणि फ्रान्समधील मजबूत धोरणात्मक भागीदारी आणखी बळकट झाली असून यामध्ये संरक्षण, तंत्रज्ञान, व्यापार आणि जागतिक सहकार्यावर महत्त्वाच्या चर्चा झाल्या.

फ्रान्स भेटीदरम्यान, पंतप्रधान मोदी आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी जबाबदार एआय विकासावर लक्ष केंद्रित करणाऱ्या ए आय अर्थात कृत्रीम बुद्धिमत्ता कृती परिषदेचं सह-अध्यक्षपद भूषवलं. यापुढच्या ए आय परिषदेचं यजमानपद, भारताकडे असल्याची घोषणा मोदी यांनी यावेळी केली.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात मारसेलीस या स्थळाला मोठं महत्त्व आहे. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, समुद्रकिनाऱ्याजवळ जहाजातून उडी मारुन मार्सेलीस बंदरावर पोहोचले होते; त्या ठिकाणालाही मोदी यांनी भेट दिली. सावरकरांना पाठिंबा देणाऱ्या आणि त्यांना ब्रिटिशांच्या ताब्यात देण्यास विरोध करणाऱ्या फ्रेंच कार्यकर्त्यांचे आणि जनतेचे पंतप्रधान मोदी यांनी यावेळी आभार मानले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉ यांच्या हस्ते मार्सेलीस इथे भारताच्या नव्या वाणिज्य दूतावासाचं उद्घाटनही करण्यात आलं. भारतामध्ये अधिकाधिक गुंतवणूक करण्याचं आवाहन मोदी यांनी फ्रांसमधील उद्योजक आणि कंपन्यांना केलं. तत्पूर्वी पहिल्या महायुद्धातील हुतात्मा भारतीय जवानांना उभय नेत्यांनी आदरांजली अर्पण केली. भारत आणि फ्रांस यांच्या संयुक्त भागीदारीतील अणूऔष्णिक ऊर्जा प्रायोगिक अणुभट्टी प्रकल्पाला भेट दिली.

**अमित शहा**

राज्यांमधील सहकारी संस्थांचा एकसमान आणि संतुलित विकास सुनिश्चित करण्यासाठी सरकार विशेष उपाययोजना करत असल्याचं सहकार मंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथे सहकार मंत्रालयाच्या संसदीय सल्लागार समितीच्या पहिल्या बैठकीत ते बोलत होते. देशातील सहकारी संस्थांच्या विकासातील प्रादेशिक असमानता दूर करण्यासाठी सरकार पावलं उचलत असून राष्ट्रीय सहकारी डेटाबेस विकसित करण्याचं काम जवळजवळ पूर्ण झालं असल्याचं त्यांनी सांगितलं. प्रदेशानुसार वर्गवारी केलेल्या देशभरातील सहकारी संस्थांची माहिती आता एका क्लिकवर उपलब्ध आहे असं शहा यांनी यावेळी सांगितलं.

**रेडिओ दिन**

जागतिक रेडिओ दिवस आज साजरा केला जात आहे. दरवर्षी 13 फेब्रुवारी रोजी, रेडिओच्या महत्त्वाबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि रेडिओद्वारे माहिती मिळवण्याकरता प्रोत्साहन देण्यासाठी, जागतिक रेडिओ दिवस साजरा केला जातो. 'रेडिओ आणि हवामान बदल' ही यंदाच्या जागतिक रेडिओ दिनाची संकल्पना आहे.

रेडिओ म्हणजे संवादाचं टिकाऊ, बहुमुखी आणि सर्वत्र सहज उपलब्ध होणारं माध्यम असून त्याचं हे महत्त्व साजरं करण्याची संधी म्हणजे 'जागतिक रेडिओ दिन' असं युनेस्कोच्या महासंचालक ऑड्रे अझौले यांनी म्हटलं आहे. सध्या वेगाने बदलणाऱ्या जगात हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी आणि त्याच्याशी जुळवून घेण्यासाठी रेडिओ अनेकविविध मार्गांनी काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

बहुजन हिताय बहुजन सुखाय या ब्रीदवाक्यासह, जगातील सर्वात मोठं रेडिओ जाळं असलेलं आकाशवाणी हे देशातील सर्व लोकांपर्यंत पोहोचणारं माध्यम आहे. बातम्या आणि माहितीच्या प्रसाराद्वारे, राष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आर्थिक विकासात रेडिओची महत्त्वाची भूमिका असल्याचं प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सहगल यांनी म्हटलं आहे.

भारताच्या समृद्ध संस्कृती आणि परंपरांचं वाहक असलेल्या आकाशवाणीनं लोकांना देशातील वैज्ञानिक प्रगतीच्या प्रवासाशीही जोडलं आहे. आकाशवाणीने स्पर्श केला नाही असा रोजच्या जीवनातला एकही पैलू नाही असं प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी म्हटलं आहे. नऊ दशकांपासून आकाशवाणी माहिती, शिक्षण आणि मनोरंजनासह श्रोत्यांपर्यंत पोहोचत आहे; असं आकाशवाणीच्या महासंचालक डॉ. प्रज्ञा पालीवाल गौर यांनी श्रोत्यांना दिलेल्या आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**महाकुंभ**

प्रयागराज इथल्या महाकुंभमेळ्यात काल दोन कोटींहून अधिक भाविकांनी माघ पौर्णिमेनिमित्त स्नान केलं. उत्तर प्रदेश सरकारनं विशेष वाहतूक व्यवस्थेसह कडक सुरक्षा व्यवस्था ठेवली आहे. 13 जानेवारी रोजी महाकुंभमेळ्याला सुरुवात झाल्यापासून आतापर्यंत 46 कोटींहून अधिक भाविकांनी त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान केलं आहे.

**लोकसभा**

लोकसभेत आयकर विधेयक, 2025आज सादर केलं जाणार आहे. आयकराशी संबंधित कायदयांचं एकत्रीकरण आणि काही सुधारणा करण्याच्या उद्देशानं बनवलेलं हे विधेयक सभागृहाच्या आजच्या कामकाजात ठेवण्यात आलं आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या सत्राच्या शेवटच्या दिवशी, वक्फ सुधारणा विधेयक, 2024 वरील संयुक्त समितीचा अहवालही आज लोकसभेत मांडला जाणार आहे.

**महागाईदर**

अन्नपदार्थांच्या किमती कमी झाल्यामुळे जानेवारी महिनातला देशातला किरकोळ महागाई दर पाच महिन्यांच्या नीचांकी म्हणजे 4 पूर्णांक 31 दशांश टक्क्यांवर खाली आला आहे. डिसेंबरमध्ये महागाई दर 5 पूर्णांक 22 दशांश टक्के होता. सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, शहरी भागात महागाई दर 3.87 टक्के, तर ग्रामीण भागात 4.64 टक्के राहिला. अखिल भारतीय ग्राहक अन्न किंमत निर्देशांकावर आधारित गेल्या महिन्यातील अन्न महागाईचा दर हा तात्पुरता 6 पूर्णांक 02 शतांश टक्के नोंदवला गेला असून डिसेंबरमधल्या 8 पूर्णांक 39 टक्क्यांवरून तो कमी झाला आहे. जानेवारीमध्ये वस्तू, सेवा आणि अन्न महागाईतील घसरण प्रामुख्यानं भाज्या, अंडी, डाळी, धान्ये आणि त्यांच्या उत्पादनांच्या तसंच कपडे, शिक्षण आणि आरोग्य सेवांच्या किमतीत घट झाल्यामुळे झाली.

**म्युच्युअल**

भांडवली म्युच्युअल फंडांमध्ये गेल्या महिन्यात 39 हजार कोटी रुपयांहून अधिक निव्वळ गुंतवणूक झाली. भारतीय म्युच्युअल फंड्स संघटनेनं काल  प्रकाशित केलेल्या आकडेवारीनुसार, लहान भांडवली फंडांमध्ये 22 टक्क्यांची वाढ होऊन 5 हजार 720 कोटी रुपये गुंतविण्यात आले. तर मध्यम भांडवली फंडांमध्ये एक टक्क्याहून अधिक वाढ होऊन 5 हजार 147 कोटी रुपये गुंतविण्यात आले.

**शेअर**

मुंबई शेअर बाजाराचा सूचकांक सेन्सेक्स काल 122 अंकांनी घसरुन 76 हजार 171 अंकांवर बंद झाला. त्याचप्रमाणं राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी हा सूचकांक 26 अंकांनी घसरुन 23 हजार 45 अंकांवर स्थिरावला.

**नव्यानोटा**

भारतीय रिझर्व्ह बँकेने नवीन मालिकेतील 50 रुपयांच्या नोटा जारी करण्याची घोषणा केली आहे. महात्मा गांधी यांच्या चित्रासह गव्हर्नर संजय मल्होत्रा यांची स्वाक्षरी असलेली ही नवी नोट असेल. रिझर्व्ह बँकेने यापूर्वी जारी केलेल्या सर्व 50 रुपयांच्या नोटाही व्यवहारात कायदेशीर चलन म्हणून कायम राहतील असं रिझर्व्ह बँकेनं कळवलं आहे.

**मोफत वाटप**

राजकीय पक्षांनी निवडणुकीपूर्वी मोफत वस्तू द्यावयाच्या घोषणा करण्याच्या पद्धतीवर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. मोफत वस्तूंची सवय लागली तर लोक काम करणार नाहीत, असं न्यायालयाने म्हटलं आहे. नागरी भागात बेघर लोकांच्या निवाऱ्याच्या हक्कासंदर्भात न्यायमूर्ती बी आर गवई आणि ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांच्या पीठासमोर सुनावणी सुरू असताना न्यायालयाने काल ही टिप्पणी केली. निवारा देण्याचा हेतू चांगला आहे, मात्र त्यांना मुख्य प्रवाहात सामील करून घेणं जास्त योग्य होणार नाही का, असा प्रश्न न्यायालयाने सरकारला यावेळी विचारला.

**रविदास जयंती**

संत रविदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त काल महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन इथं त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केलं. यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, राज्यपालांचे उपसचिव एस. राममूर्ती, राज्यपालांचे परिवार प्रबंधक जितेंद्र वाघ तसच राजभवनातील अधिकारी, पोलीस अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

**हुतात्मा-गडचिरोली**

महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड तालुक्यातील फुलनार जंगल परिसरात माओवाद्यांविरोधात केलेल्या यशस्वी कारवाईदरम्यान गोळी लागून शहीद झालेले पोलिस अंमलदार सी-60 कमांडो महेश नागुलवार यांच्या पार्थिवावर काल आनखेडा इथे अंत्यसंस्कार करण्यात आले. नक्षलमुक्त भारताच्या अभियानात महेश नागुलवार यांनी राष्ट्रासाठी दिलेलं बलिदान कधीही विसरणार नाही त्यांचं बलिदान व्यर्थ जाणार नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागुलवार यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारतर्फे 2 कोटी रुपयांचं आर्थिक सहाय्य देण्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली.

**क्रिकेट**

अहमदाबाद इथं काल पन्नास षटकांच्या अंतिम क्रिकेट सामन्यात भारताने इंग्लंडचा 142 धावांनी पराभव करून तीन सामन्यांची ही मालिका पूर्णपणे जिंकली आहे. 357 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, इंग्लंडचा डाव पस्तिसाव्या षटकांतच 214 धावांवर संपला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाने शुभमन गिलच्या 112धावांच्या जोरावर 50 षटकांत 356 धावा केल्या.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.